प्रपत्र - अ

## स्विकृती पत्राचा नमूना

क्रमांक:-
दिनांक:-

प्रति,
मा. सदस्य सचिव,
महाराष्ट राज्य महिला आयोग,
गृहनिर्माण भवन, पोट माळा,
म्हाडा बिल्डींग, कलानगर,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

विषय:- संशोधन प्रकल्पांना अनुदान देणेबाबत
संदर्भ:- महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची दि.२९.०५.२०१८ रोजीची जाहीरात

महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने आमच्या संशोधन प्रकल्पास आपण मान्यता दिल्याबद्दलचा आदेश प्राप्त झाले आहेत. या संशोधन प्रकल्पात काम करण्यासाठी आम्ही इच्छूक असून नियमानुसार सर्व अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रकल्पाचे काम यशस्वीरित्या विहीत वेळेत पूर्ण करुन देण्यास आमची सहमती आहे.

आपले विश्वासू,

(                    )

सही व शिक्का

प्रपत्र - ब


सत्यमेव जयते

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
Maharashtra State Commission For Women

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com


क्रमांक:-ममआ-२०१८/संप्र/का-०३/ 1696.
दिनांक:- १०.०९.२०१८

प्रति,
महाविद्यालय / स्वयंसेवी संस्था

विषय:- संशोधन प्रकल्पांना अनुदान देणेबाबत.
संदर्भ:- महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची दि.२९.०५.२०१८ रोजीची जाहीरात.

उपरोक्त संदर्भाधिन जाहिरातीनुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत मागविण्यात आलेल्या संशोधन प्रकल्पांना अनुदान देणे संदर्भात आयोगामार्फत समिती गठित करण्यात आली होती. सदर छाननी समितीची बैठक दि. २९.०८.२०१८ रोजी पार पडली. आपल्या संशोधन प्रकल्पाला अनुदान देण्याची मान्यता समितीमार्फत देण्यात आली आहे. आयोगाचे पत्र संस्थेस प्राप्त होताच आपण आपली सहमती असल्यास प्रत्यक्ष महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालय, मुंबई येथे खालील तपशिलाप्रमाणे कागद पत्रासोबत स्वत: अथवा जबाबदार प्रतिनिधीने उपस्थित राहावे. आपण उपस्थित न राहिलयास आपली निवड रद्द करण्याचा अधिकार आयोगाने राखून ठेवला आहे.

१) संस्थेच्या लेटर हेड वर स्विकृती पत्र, (मूळ प्रत), संस्था प्रमुख / महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या प्रति स्वाक्षरी व शिक्का.
२) अनुदान स्विकृतीकरीता:- अ) संस्थेच्या बॅक खातेदाराचे नांव, ब) खाते क्रमांक, क) बँकेचे नांव व पत्ता, ड) बँक शाखा, ई) आय एफ सी कोड, उ) रद्द धनादेशाची प्रत इत्यादी.
३) संशोधन प्रकल्पाची (Methodology) कार्यपध्दती सादर करणेसाठी ५-१० मिनिटे कालावधी प्रकल्प संचालक / समन्वयक / सादरकर्ता यांस देण्यात येईल.
४) संस्थेच्या / महाविद्यालयाचे उपस्थित प्रतिनिधी यांनी अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | मुंबई व पुणे | २६.०९.२०१८ | ११.०० ते ०४.०० |
| २ | कोकण, नाशिक, नागपूर, अमरावती व औरंगाबाद | २७.०९.२०१८ | ११.०० ते ०४.०० |

(डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे)
सदस्य सचिव

प्रपत्र - क.

// स्त्रीशक्तितुल्या सदा //

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**महाराष्ट्र राज्य महिला आयोग**
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

## :: संशोधन प्रकल्पासाठी मार्गदर्शक सूचना ::

१. अहवालामध्ये आपल्या संस्थेस मान्य झालेल्या संशोधन विषयाची सविस्तर प्रस्तावना, कार्यपध्द्ती व निष्कर्ष यांची मांडणी सुस्पष्ट असावी.

२. शासन तसेच विद्यापीठांना सादर करण्याच्या पध्दतीनुसार संशोधन अहवाल आयोगास सादर करावा,

३. संशोधन प्रकल्पावर काम करीत असतानाचे काही फोटो अहवालात असावेत.

४. आयोग कार्यालयामार्फत समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीने ठरविलेल्या संशोधन प्रकल्पासाठी करण्यात एकूण मंजूर सानुग्रह अनुदानाच्या ५०% रक्कम प्राप्त झाल्या पासून ४ महिन्याच्या आत आयोग कार्यालयास संशोधन अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

५. आयोग कार्यालयामार्फत संशोधन प्रकल्पासाठी संस्थेच्या नावे रद्द धनादेश, स्विकृतपत्र, प्राधिकारपत्र इ. सादर केल्यावरच आगाऊ स्वरुपा द्वारे धनादेश अदा करण्यात येईल. आपण संशोधन अहवाल तसेच उपयोगिता प्रमाणपत्र (UC) आयोगास सादर केल्यानंतर समितीच्या पडताळणीनंतर उर्वरित ५०% रक्कम धनादेश द्वारे अदा करण्यात येईल.

६. उर्वरित ५० % धनादेश मिळण्याकरीता आपले लेखा विषयक खर्च विवरण पत्र, उपयोगिता प्रमाणपत्र, रद्द धनादेश, प्राधिकार पत्र. इ. उदा. संस्थेचे नांव. बँकेचे नांव, बँक खातेदाराचे नांव, खाते क्रमांक, IFCS Code, बँकेचा पत्ता पिनकोडसह. तसेच उपयोगिता प्रमाणपत्रावरील रक्कम व केलेल्या खर्चाच्या रक्कमा यांची सांगड घालणे आवश्यक आहे. याबाबत आयोग कार्यालयास कळवावा.

७. सदर संशोधन प्रकल्पातील आयोगाच्या अनुदानातून जे काम केले आहे त्या खर्चाचे सविस्तर विवरण कार्यालय/संस्था प्रमुख यांच्या शिक्का स्वाक्षंरीसह स्वतंत्रपणे द्यावे. तसेच प्रमाणकाच्या (Voucher) छायाकिंत प्रती जोडण्यात याव्यात.

८. सदर प्रकल्पाचा खर्च हा शासनाच्या एकत्रित निधीमधून करण्यात येणार असल्याने शासनाच्या वित्तीय नियमांच्या अधिन राहून खर्च करण्यात यावा. मंजूर सानुग्रह अनुदानातून केलेल्या खर्चास संबंधित जबाबदारी राहील.

९. सदर संशोधन अहवाल २ प्रतीत आयोगास सादर करण्यात यावा. तसेच सपूर्ण संशोधनाचा सारांश (Summary) सादर करावी.

१०.आयोगाने संशोधन प्रकल्पबाबत अंतिम निर्णय राखून ठेवला आहे.

११. संशोधन प्रकल्पास परस्पर प्रसिध्दी देवू नये.

१२. संशोधनाचा दर्जा सुमार असल्यास अथवा संशोधनात सत्यता आढळून न आल्यास उर्वरित अनुदान रोखण्यात येईल.

(डॉ.मंजूषा सुभाष मोळवणे)
सदस्य सचिव